मालेगाव महानगरपालिका, मालेगाव.

इमारत बांधकाम परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र

परवानगी नंबर : ९७८ जा.नं. ९७८ तारीख ०६-०२-२०१३

अर्जदार श्री. नवकार डेव्हलपर्स तर्फे भागीदार सौ.दक्षा संघराज गोलेच्छा व इतर-२, व्यवसाय- ड. हितेश लांकरिया,आर्कि., मालेगाव. यांस संगमेश्वर वॉर्ड सि.स.नं. ११०१ प्लॉ.नं. -- येथे

सायनल पर्या नं. ७८ अ/१० नगर रचना मर्या मालेगाव क्रं. २

आपले वरील संदर्भाचे जागेवरील रहिवास, स्लॉट, दिघीकल तळ+ पहिला+ दुसरा मजला एका मंजूर बांधकाम नकाशानुसार परवानगी/नुतनीकरण बाबत प्लॅनसह अर्ज ता. २५/०१/२०१३ रोजी सादर झाला. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व ४९ अन्वये सोबतच्या नकाशात -------- रंगाने दुरुस्ती केलेला नकाशा प्रमाणे बांधकाम परवानगी/नुतनीकरण प्रारंभप्रमाणपत्र देण्यात येत आहे. सदर अर्जदारास खालील अटी लागू राहतील.

१. सदर प्रमाणपत्र अर्जदारास मिळाले तारखे पासुन एक वर्षा पर्यंत वैध राहील. एक वर्षाच्या आत काही कारणास्तव बांधकाम न झाल्यास किंवा अपूर्ण राहिल्यास प्रमाणपत्राचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४८ अन्वये सदर परवानगी रद्द होईल.

२. सदर प्रमाणपत्र मिळाल्याचे तारखे पासुन एक वर्षा पर्यंत वैध राहील. त्यानंतर प्रत्येक वर्षी पहिल्याचे अंती नुतनीकरण केला नाही तर तीन वर्षा पर्यंत वैध राहील व पाच वर्षानंतर रद्द समजणेत येईल.

३. सदर प्रमाणपत्र बदल करण्याचा, अट मध्ये वाढ करण्याचा व मंजूर नकाशात बदल करण्याचा हक्क महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

४. खिडक्यांची परवानगी महसुल विभागाकडून घेतल्या शिवाय बांधकाम करू नये.

५. बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणेच करावे. बांधकामात कोणत्याही प्रकारचा फरक/बदल परवानगी घेतल्या शिवाय करू नये.

६. महानगरपालिकेच्या विकास नियमानुसार बांधकाम असावे लागेल.

७. बांधकामाचा वापर फक्त रहिवासा साठीच करावयाचा आहे.

८. मंजुर नकाशासह सदर प्रमाणपत्र केव्हाही जागेवर उपलब्ध होईल अशा ठिकाणी लावावे. महानगरपालिकेच्या अधिका-यांनी अथवा इतर शासकीय अधिका-यांनी पाहणी केली असता त्यांना सदर कागदपत्र दाखविणे आवश्यक आहे.

९. अ) सदर प्रत्यक्ष बांधकाम करीत असतांना पुढील निरीक्षण, पूर्ण झालेला कामाचे मंजुर नकाशाप्रमाणे मोजणी करून घेणे आवश्यक आहे व त्याचा आकारणीसाठी उपयोग करणेसाठी पाठविणे आवश्यक आहे.

ब) अर्जदार यांनी सादर केलेली माहिती व जाहीरात चुकीची आढळल्यास अथवा दिशाभूल करणेचा आढळल्यास या मंजूरीचे रद्द समजण्यात येईल.

१०. येणारे सांडपाणी योग्यरित्या बांधकामासंबंधी स्वेापाहीने योग्य निचरा होईलयाची व्यवस्थेची सर्व जबाबदारी तुमचेवर राहील. बांधकाम पूर्ण अर्जदाराने महानगरपालिकेस कळवावे.

११. बांधकाम सुरु करणे आधी इतर सर्व संबंधित कायद्यान्वये आवश्यक असणाऱ्या परवानगी ही मूळ्यवती अर्जदाराने घेणे आवश्यक राहील.

१२. महानगरपालिकेकडून भोगवटा पूर्णत्व प्रमाणपत्र (Plinth Completion Certificate) घेतल्याशिवाय त्याखालील बांधकाम करता येणार नाही.

१३. भारतीय विद्युत अधिनियम व त्याखालील नियमांचे उल्लंघन होणार नाही याची खबरदारी घेण्याची जबाबदारी अर्जदारांवर राहील.

१४. महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय सार्वजनिक रस्त्यावर बांधकामाचा माल अथवा ढिग साठवता येणार नाही. त्यावेळी अशी परवानगी देतांना जादा वेळी लागणाऱ्या फीच्या किंवा महानगरपालिका ठरवील त्याप्रमाणे भाडे अगोदरच महानगरपालिकेस द्यावयाचे आहे.

* टिप : अशी परवानगी बांधकाम पूर्ण होईपर्यंत देण्यात येईल. बांधकामाचा माल अथवा ढिग न हलविल्याचे लक्षात आल्यास किंवा परस्पर निर्माण झाल्याचे महानगरपालिकेस आढळून आल्यास महानगरपालिका अनंतरा विरुध्द कारवाई करील व माल अथवा ढिग स्वतः महानगरपालिका हलवून घेईल व सदर कामी झालेला खर्च अंजदाराकडून वसूल केला जाईल.

१५. प्लॉटमध्ये कमीत कमी ४ झाडे लावून ती जतन करण्यात आली आहेत याचा पुरावा दाखवल्याशिवाय बांधकाम पूर्णत्वाचा प्रमाणपत्र (Completion Certificate) देण्यात येणार नाही.

१६. इमारतीचे सांडपाणी इतरत्र सोडून सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करू नये. सांडपाणी महानगरपालिकेच्या गटारात सोडावे. गटार नसल्यास खालच्या जागेत सोकपीट बांधून सांडपाण्याचा निचरा जमिनीची सोय करावी.

१७. घरात जाणे येणे करिता महानगरपालिकेचे गटारीवर छाप टाकावा. छाप गटारी इतकी रुंद ३ फुट लांब व रस्त्याचे दरीस असावा.

१८. संडासाचे बांधकाम करते वेळी १ व २ नंबरच्या टाकीवर ४ इंची व्यासाचे २ पेन्ड पाईप वरपर्यंत नेवून वरच्या बाजूस दोन टोपा बसवण्यात यावे हे पेन्ड पाईप सर्वसाधारण इमारतीचे उंचीपेक्षा ४ फुट उंच असावे तसेच डासांची उत्पत्ती (Mosquito Free) होणार नाही अशा प्रकारे बंदीस्त होकं करण्यात यावी.

१९. संडासाच्या भिंतीला कमी ३० फुटाच्या अंतरावर आड असणे विहिर नसावी.

२०. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६३ अन्वये वरील बांधकाम पूर्ण झाल्या नंतर एक महिन्याचे आत बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्र (Completion Certificate) मिळणे साठी महानगरपालिकेकडे अर्ज करावा. सदर प्रमाणपत्र मिळाल्यानंतर इमारतीचा वापर सुरु करावा. परवानगी शिवाय इमारतीचा वापर केल्याचे आढळून आल्यास उपरोक्त कलमान्वये पुढील कारवाई करण्यात येईल.

२१. ही विकास परवानगी / भोगवटा मिळाल्या बरोबर भूखंड धारकाने / जमीन मालकाने / विकसन करारांने अंतर्गत भूखंड / जागेवर खालील प्रमाणे सविस्तर तपशिल असलेला फलक लावणे बंधनकारक राहील.

अ) मालक / विकसन कर्ता / कारू विशारद आर्कि : कंत्राटदार यांचे नाव व पत्ता

ब) संदर्भित भूखंडाचा अहवाल नंबर दिनांक, वॉर्ड : नंबर व भूखंडाचे चतुरसिमा हद्दीचे सविस्तर तपशिल व क्षेत्र

क) महानगरपालिकेने मंजूर केलेल्या परवानगीचा : नंबर व दिनांक

ड) मंजूर नकाशाप्रमाणे प्रस्तुत केलेले बांधकामाचे : अनुज्ञेय क्षेत्र

इ) प्रस्तुत सेवांची वास्तव्यासाठीच्या सदनिकांची संख्या व व्यावसायिक वापरासाठीच्या दुकानांची / गाळ्यांचे संख्या, प्रत्यक्ष गाळ्यांचे / सदनिकांचे क्षेत्रासहित

फ) मंजूर नकाशाप्रमाणे पुर्ण झालेले जोते/मजले/ : पोटमजले, तसेच इमारत वापर दिनांकासह सविस्तर तपशिल.

२२. प्रस्तावित बांधकाम हे भूकंप रोधक करण्याचे दृष्टीने भारतीय मानक मानकेनुसार निर्देशित केलेल्या मानकानुसार बांधकाम करणे बंधनकारक राहील.

२३. बांधकामाच्या नियोजित जागेतून विद्युत वाहिनी जात असल्यास बांधकाम करण्यापूर्वी संबंधित खात्याकडून ना हरकत दाखला घेणे बंधनकारक राहील.

२४. बांधकाम नकाशावर दर्शविलेल्या नुसार जल संधारणाची व्यवस्था करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र मिळणार नाही.

२५. सदर भूखंडात कमीत कमी ६० झाडे लावून त्यांचे जतन व संवर्धन करावे.यासाठी घेतलेली अनामत रक्कम तीन वर्षानंतर झाडांची स्थिती पाहून परत करण्यात येईल. झाडांचे संवर्धन योग्य रितीने न झाल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२६. सदर बांधकाम परवानगी फक्त जोत्या पर्यंतच मर्यादित राहील.

२७ सदर इमारतीवर अपारंपारिक सौर ऊर्जा संयंत्र बसविणे तसेच सांड ऊर्जेवर चालणारे पाण्याचे सर्वत्र बसविणे बंधनकारक राहील.

२८. बांधकामासाठी पिण्याचे पाण्याचा वापर करता येणार नाही. बांधकामासाठी लागणारे पाण्याची स्वतंत्ररित्या व्यवस्था करावी लागेल.

२९ अर्जदाराने अर्जासोबत दिलेली माहिती खोटी अथवा दिशाभूल करणारी आढळल्यास बांधकाम परवानगी रद्द करण्यात येईल.

३०. सदर इमारतीत अग्निशमन व्यवस्था विकसित करून त्याचे अग्निशमन विभागाची तपासणी घेणे बंधनकारक आहे.

सही/-
मुख्याधिकारी,
मालेगाव मध्यवर्ती नगरपालिका, मालेगाव

प्रत :

१. गृहकर विभाग, प्रभाग क्र.१, मालेगाव.
२. श्री. नवकार डेव्हलपर्स तर्फे भागीदार सौ.दक्षा मेघराज ओस्तवाल व इतर २ यांचे वतीने श्री. रितेश कांकरिया,आर्कि., मालेगाव,
३. मा.जिल्हाधिकारी,नाशिक.
४. म.सहा संचालक,नगर रचना,नाशिक.

Bmd.Permission/2016/Form-6